**मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड, प्लॉट नं.ए-१ आणि ए-२, एमआयडीसी क्षेत्र, घुग्घुस, तालुका व जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित स्पॉन्ज आयर्न प्रकल्पाचे अतिरिक्त २ X५०० टीपीडी किल्नच्या स्थापनेव्दारे ३,२४,००० टन प्रतिवर्ष (४ X १०० टीपीडी व ४ X ५०० टीपीडी) ते ६,८४,००० टन प्रतिवर्ष पर्यत व वीज प्रकल्पाचे २५ मेगावॅट ते ८५ मेगावॅट (ड्ब्लुएचआरबी +एएफबीसी) क्षमतेच्या विस्तारिकरण प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा ईतिवृत्त**

---

| | | |
|---|---|---|
| दिनांक | : | ०६/०५/२०२२ |
| वेळ | : | दुपारी १२:०० वाजता |
| स्थळ | : | प्रकल्प स्थळ,<br>मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड,<br>प्लॉट नं.ए-१ आणि ए-२, एमआयडीसी क्षेत्र, घुग्घुस, तालुका व जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र |

**<u>प्रस्तावना:-</u>**

मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड, प्लॉट नं.ए-१ आणि ए-२, एमआयडीसी क्षेत्र, घुग्घुस, तालुका व जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या

प्रस्तावित स्पॉन्ज आयर्न प्रकल्पाचे अतिरिक्त २ X ५०० टनप्रतिदिवस किल्नच्या स्थापनेव्दारे ३,२४,००० टन प्रतिवर्ष (४ X १०० टन प्रतिदिवस व १ X ५०० टन प्रतिदिवस) ते ६,८४,००० टन प्रतिवर्ष पर्यत व वीज प्रकल्पाचे २५ मेगावॅट ते ८५ मेगावॅट (ड्ब्लुएचआरबी +एएफबीसी) क्षमतेच्या विस्तारिकरण प्रकल्पाच्या उभारणीबाबतच्या प्रस्तावाबाबत प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करण्यासाठी आवश्यक असलेला प्रकल्प स्थानाच्या परिघातील 10.0 कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल (EIA) तयार करण्यासाठी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना टीओआरसाठी अर्ज सादर केला. तेथील तज्ज्ञ मुल्यांकन समिती (EAC-Industry I) यांनी दिनांक २० जुलै २०२१ रोजी सदर प्रस्तावित प्रकल्पास मान्यता दिलेली आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघातील पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालासोबत पर्यावरण जाहिर जनसुनावणी आयोजित करणे व त्यात प्रकल्पग्रस्त, स्थानिक लोक यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी उपस्थित केलेले पर्यावरणीय मुद्दे अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात समाविष्ट करण्याचे निर्देश दिले.

प्रकल्प प्रवर्तक मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड, प्लॉट नं.ए-१ आणि ए-२, एमआयडीसी क्षेत्र, घुग्घुस, तालुका व जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांनी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे दिनांक ०७/१२/२०२१ रोजी अर्ज सादर केला. म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर व जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्या समन्वयाने जिल्हाधिकारी चंद्रपूर, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०६ मे, २०२२ रोजी पर्यावरणविषयक जनसुनावणी आयोजित करण्यास मान्यता दिली.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी बैठकीच्या ३० दिवस अगोदर जाहिर जनसुनावणीची सूचना एक स्थानिक वृत्तपत्रात स्थानिक भाषेत व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात इंग्रजीमध्ये प्रकाशित करणे बंधनकारक असल्याने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ चंद्रपूर यांनी स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत दिनांक ०३/०४/२०२२ रोजी जाहिर सूचना प्रकाशित केलेली होती. त्यात नियोजित प्रकल्पामुळे परिसरातील रहिवाशी, पर्यावरणविषयक कार्यरत संस्था, सदर प्रकल्पामुळे विस्थापित होणारे रहिवाशी किंवा सदर प्रकल्पामुळे अन्य प्रकारे प्रभावित होणारे रहिवाशी यांना सदर प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक, विचार, टीकाटिप्पणी, सूचना किंवा आक्षेप जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून जनसुनावणीच्या तारखेपर्यंत स्थानिक चंद्रपूर कार्यालयात लेखी वा ईमेलव्दारे सादर करण्याचे आवाहन करण्यात आलेले होते.

या प्रकल्पाबाबत तयार करण्यात आलेला प्रारुप पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत खालील अधिसूचित कार्यालयात नागरिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करुन देण्यात आलेला होता:-

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिएल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर
२) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, १५ वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
३) सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा माळा, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कलजवळ, सायन पूर्व, मुंबई-४०० ०२२
४) प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
५) उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उद्योग भवन, पहिला माळा, रेल्वे स्टेशन रस्ता, चंद्रपूर
६) जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपूर
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
८) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, चंद्रपूर
९) उप विभागीय अधिकारी, उप विभागीय कार्यालय, चंद्रपूर
१०) मुख्य अधिकारी, नगर परिषद, घुग्घूस, ता. जि. चंद्रपूर
११) तहसीलदार, तहसील कार्यालय, चंद्रपूर, जि. चंद्रपूर
१२) पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर, ता. जि. चंद्रपूर
१३) ग्रामपंचायत कार्यालय, म्हातारदेवी, ता. जि. चंद्रपूर
१४) ग्रामपंचायत कार्यालय, बेलसनी, ता. जि. चंद्रपूर
१५) ग्रामपंचायत कार्यालय, शेणगाव, ता. जि. चंद्रपूर
१६) ग्रामपंचायत कार्यालय,सोनेगांव, ता. जि. चंद्रपूर
१७) ग्रामपंचायत कार्यालय,अंतुर्ला, ता. जि. चंद्रपूर

१८) ग्रामपंचायत कार्यालय, महाकुर्ला, ता. जि. चंद्रपूर
१९) ग्रामपंचायत कार्यालय, पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर
२०) ग्रामपंचायत कार्यालय, वढा, ता. जि. चंद्रपूर
२१) ग्रामपंचायत कार्यालय, उसगांव, ता. जि. चंद्रपूर
२२) ग्रामपंचायत कार्यालय, नकोडा, ता. जि. चंद्रपूर

वरिल अनुक्रमांक ६ ते २२ वर नमुद अधिसुचित शासनाच्या विभागांनादेखील त्यांनी त्यांच्या स्तरावर सदरहू पर्यावरणविषयक जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. अशा प्रकारे जाहिर जनसुनावणीबाबत अधिसुचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन व्यापक स्वरुपात प्रसिध्दी देण्यात आली, जेणेकरुन प्रकल्पबाधित किंवा संबंधित व्यक्तींना त्यांचे विचार, टीकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप संबंधित विभागास नोंदविणे सोईचे होईल.

पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू जनसुनावणी ही प्रकल्पा स्थानावर आयोजित करण्यात आलेली होती.

पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी कार्यालयीन आदेश ई-३०/२०२२ व्दारा पत्र क्रं. बीओ/जेडी (डुबल्युपीसी) पीएच/बी-२२०४२८-FTS-००६५ दिनांक २८/०४/२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | **अध्यक्ष** |
| २) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी - प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, चंद्रपूर | - | **समन्वयक** |

या कार्यालयास उपरोक्त प्रकल्पाबाबत ६७ सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप प्राप्त झालेले असून संबंधित व्यक्ती/संस्था यांना जनसुनावणीस उपस्थित राहून त्यांच्या सूचना सूचना, तक्रारी, निवेदने, आक्षेप उपस्थित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जनसुनावणी दरम्यान उपस्थितांचे हजेरीपट तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर जाहिर जनसुनावणी घेण्यासाठी गठित केलेल्या समितीचा आदेश सहपत्र-2 प्रमाणे सोबत जोडलेले आहेत.

**<u>जनसुनावणीचे इतिवृत्तः-</u>**

जनसुनावणीच्या सुरवातीस श्री अतुल सातफळे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री विशालकुमार मेश्राम, अपर जिल्हादंडाधिकारी, चंद्रपूर तथा अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री अ. मा. करे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ. चंद्रपूर तथा सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्पाचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रातील कार्यरत विविध संस्था व मोठया संख्येने उपस्थित स्थानिक यांचे स्वागत करुन जनसुनावणीच्या कार्यपध्दतीबद्दल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही पर्यावरणविषयक सूचना, विचार, आक्षेप उपस्थित करण्याचे आवाहन केले. त्यांनी सांगितले की सदरहू जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पग्रस्त यांच्यासाठीच आयोजित करण्यात आलेली असून, जेणेकरून पर्यावरणविषयक प्रश्न, शंका यांचे निरसन होईल.

समन्वयक यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते.

त्यांनी सांगितले की अधिसूचनेतील तरतुदींनुसार सदरहू बैठकीचे छायाचित्रिकरण व व्हिडीओ शुटींग करण्यात येत असून सादरीकरणानंतर उपस्थितांना आपले प्रश्न, सूचना, विचार, आक्षेप शांतपणे मांडावेत. त्यास प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार किंवा प्रकल्प प्रवर्तक उत्तर देतील. प्रश्न विचारताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्यात यावे.

आयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांना प्रस्तावित प्रकल्पाचे पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण करण्याची सूचना केली.

प्रकल्प अधिकारी यांनी प्रकल्पाचे विस्तारिकरण व पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत (Environment Management Plan) सादरीकरण मराठी भाषेत केले. सादरीकरणात प्रामुख्याने खालील बाबी स्पष्ट करण्यात आल्याः-

- प्रकल्पाबाबतची सविस्तर माहिती
- प्रकल्पाचे क्षेत्रफळ, अक्षांश-रेखांश,नकाशा, बुडित क्षेत्र, लाभक्षेत्र, वन क्षेत्र,प्रकल्पाचे वैशिष्ट्ये,प्रकल्पाचे महत्व, परिणाम, जमीन वापर, भूकंप स्थिरता,
- प्रकल्पाचा उद्देश, सामाजिक स्थिती, रोजगाराची संधि, शेतक-यांच्या प्रकल्पामुळे होणारा विकास,
- प्रकल्पाचे विश्लेषण, सारांश, निष्कर्ष
- सामाजिक व आर्थिक स्थितीचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमीन, ध्वनी, विस्थापन इ.बाबतची माहिती,
- नियोजित प्रकल्पामुळे हवा,पाणी,विस्थापन,जैवविविधता यावर होणारे परिणाम व व्यवस्थापन
- प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती
- इतर पर्यावरण व्यवस्थापन विषयीची माहिती

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत माननीय खासदार श्रीयुक्त बाळूभाऊ धानोरकर यांचे सदरहू प्रकल्पाबाबत प्राप्त झालेले एक निवेदन वाचून दाखविले.

माननीय खासदार धानोरकर यांनी निवेदनात असे सांगितले की लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड यांचा स्पॉन्ज आयर्नचा प्रकल्प एमआयडीसी, घुग्घुस, चंद्रपूर येथे कार्यरत असून त्याच्या प्रदूषणामुळे स्थानिक लोक, ग्रामस्थांमध्ये तीव्र रोष आहे. आरोग्य व शेतपीकांची प्रचंड हानी या प्रकल्पामुळे होत आहे. त्यांनी काही मागण्या आपल्या निवेदनात दिल्या. त्यात त्यांनी सांगितले की उदयोगापेक्षा शेतकरी व जनतेचे आरोग्य जास्त महत्वाचे आहेत. नियमांनुसार सात कि.मी. व्यक्तीस रोजगारात प्राधान्य द्यावे. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रदूषणावर नियंत्रण करावे, जेणेकरुन स्थानिकांचे आरोग्य व शेतपीकांची हाना टळेल. विद्यार्थ्यांसाठी प्राधान्याने सीबीएससीची शाळा उपलब्ध करावी, सीएसआरनिधी अंतर्गत परिसरातील विकास कामांना प्राधान्य द्यावे.

त्याचप्रमाणे मागण्यांमध्ये त्यांनी प्रकल्प परिसरातील पाणंद रस्त्यांवरिल अतिक्रमण मोकळे करणे, आरोग्य केंद्रासमोरुन ट्रक्सची वाहतुक बंद करणे, प्रदूषणाने नुकसानीची भरपाई, मयत कामगारांच्या कुटुंबातील व्यक्तींना नोकरी व इतर मागण्याचे निवेदन होते.

आयोजक यांनी मा. खासदारांचे निवेदन वाचून दाखविल्यानंतर उपस्थितांना त्यांचे प्रस्तावित विस्तारिकरण प्रकल्पाविषयी काही विचार, टीकाटिप्पणी,सूचना किंवा आक्षेप असल्यास त्या नोंदविण्याचे आवाहन केले. सदरहू जनसुनावणी ही पर्यावरणविषयक असल्याने पर्यावरणविषयकच

प्रश्न उपस्थित करण्याची व सूचना, आक्षेप नोंदविताना प्रथम आपले संपूर्ण नांव व गाव सांगण्याची सूचना केली.

**<u>जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीकाटिप्पणी, आक्षेप, सूचना तसेच प्रकल्प प्रवर्तकांनी दिलेली उत्तरे/आश्वासने खालीलप्रमाणे:-</u>**

**१) <u>श्री किशोर घुगळे, काँग्रेस पक्ष कार्यकर्ता, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | कंपनीने गेले अनेक वर्षे कॉक्रीट रस्ता बनविण्याचे आश्वासन दिलेले आहे. ते अजून पुर्ण केलेले नाही. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की ही जनसुनावणी संपली की रस्ता करण्यास सुरवात करणार आहे. स्थानिकांनी पूर्वी केलेल्या सूचना, गरज यानुसार प्रकल्पात काम होणार आहे. सहा महिन्यात आपल्या कंपनीचा चेहरामोहरा बदलला जाईल. |
| २) | त्याचप्रमाणे प्रकल्पातील डस्ट (धुळ) नियंत्रणात आणलेली नाही. तर डस्टचे निवारण कसे करणार याबाबत प्रश्न विचारला. कारण सर्वजण प्रकल्पातील डस्टमुळे त्रासलेले आहेत. | २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |
| ३) | गावात बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. तर आपण प्रकल्पात ५०० व्यक्तींना रोजगार देण्याची माहिती सादरीकरणात दिली, तर ती कशाप्रकारे देण्यात येईल याबाबत माहिती सांगण्याची सूचना केली. | शैक्षणिक अहर्तेनुसारच फक्त स्थानिकांनाच रोजगाराची संधि देणार आहोत. कंपनीमध्ये ८०-८५% लोक स्थानिक आहेत. शासकीय निर्देशांनुसार आपण स्थानिक लोकांनाच प्राधान्य देणार आहोत. |

**२) <u>श्री इबादुल हसन सिद्दीकी, जनहितैची, ता. जि.चंद्रपूर:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | जनसुनावणीची जाहिर सूचना आपण दोन पेपरात दिल्याची माहिती दिली. तर सर्व स्थानिक वृत्तपत्रात जनसुनावणीची जाहिर सूचना देणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालयाच्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना दिनांक |

| | | |
|---|---|---|
| | माईकवर भोंगा लावून गावात दवंडी देणे आवश्यक होते. त्यामुळे जास्तीतजास्त लोकांना जनसुनावणीची माहिती मिळाली असती. कारण सर्वांपर्यंत पेपर जात नाही. याचे स्पष्टीकरण देण्यात यावे. | १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१/१२/२००९ नुसार एक स्थानिक वृत्तपत्र व एक राष्ट्रीय वृत्तपत्रात जनसुनावणीबाबत जाहिर सूचना देण्याचे निर्देश आहेत. त्यानुसार स्थानिक वृत्तपत्र लोकमत यात मराठीत तर राष्ट्रीय वृत्तपत्र टाइम्स ऑफ इंडिया यात इंग्रजीत जनसुनावणीबाबत जाहिर सूचना बैठकीच्या ३० दिवस अगोदर प्रकाशित करण्यात आलेली होती. त्याचप्रमाणे प्रकल्पाचा पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल व कार्यकारी सारांश अहवाल इंग्रजी व मराठीत जिल्ह्यातील अधिसूचित कार्यालयात, मुंबईच्या पर्यावरण विभागात, मप्रनि मंडळाच्या मुख्यालयात व प्रकल्प परिसरातील स्थानिक ग्रामपंचायत कार्यालयात पत्र पाठवून स्थानिकांच्या अवलोकनार्थ व माहितीसाठी उपलब्ध करण्यात आलेला होता. त्यांना जनसुनावणीबाबत व्यापक प्रसिध्दी (wide publicity) करण्याची सूचना करण्यात आलेली होती. म.प्र.नि. मंडळाने अधिसूचनेचे तंतोतंत पालन केलेले आहे. त्यावेळी श्री इबादुल हसन सिद्दी जनहितैची_यांनी गावातून भोंगा लावून दवंडी का दिली नाही याबाबत विचारणा केली असता त्यांच्या आक्षेपांची नोंद घेण्यात आलेली आहे असे सांगण्यात आले. |
| २) | जनसुनावणी ही सामान्य माणसांची विचार,सूचना, आक्षेप मांडण्यासाठी असते. तर जनसुनावणी पूर्ण झाल्यावर त्याच्या अहवालाबाबत काहीही माहिती मिळत नाही. आम्हांला अहवालात काय लिहिले हे माहित नसते. ही स्थानिक लोकांची व्यथा आहे. | त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आपणास जनसुनावणीच्या इतिवृताची एक प्रत मागणी केल्यास उपलब्ध करुन देण्यात येईल. |
| ३) | एखादा प्रकल्प हा ग्रामपंचायत, पंचायत समिती,जिल्हा परिषद, नगर पालिका किंवा महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात कार्यान्वित होताना त्यास प्रकल्प कार्यान्वित करण्याचे ना हरकत प्रमाणपत्र अदा करताना काय नियम आहे, एका अधिका-याच्या संमतीने तो प्रकल्प | आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू प्रकल्प हा महाराष्ट्र शासनाच्या घोषित "औद्योगिक विकास" क्षेत्रात कार्यान्वित असल्याने त्यास ग्रामपंचायतीची ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही. महाराष्ट्र शासनाने हे क्षेत्र औद्योगिक उपक्रमांसाठी अधिसूचित केलेले आहे. |

| | | |
|---|---|---|
| | कार्यान्वित करु शकतो वा त्यास संपूर्ण कार्यकारी समितीची मान्यता लागते? | |
| ४) | प्रकल्पाच्या विस्तारिकरणासाठी ही जनसुनावणी आहे. तर सद्यस्थिती प्रकल्पात प्रदूषण नियंत्रण व्यवस्था कार्यान्वित आहे का? विस्तारिकरण म्हणजे प्रदूषणात वाढ करण्याची परवानगी शासन देत आहे का? याबाबत उत्तर देण्याची सूचना केली. | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले सर्वांना प्रश्न विचारण्याची संधि देण्यात यावी व उत्तरे ही एकत्रित देण्यात येतील. |
| ५) | प्रकल्पाने प्रदूषण नियंत्रणाबाबत काहीही उपाययोजना केलेली नाही. परिसरातील लोकांचे आरोग्य धोक्यात आहे. आम्ही प्रकल्पाच्या विरोधात नाही, विकासाच्या विरोधात नाही. प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्प परिसरात पिण्याची पाणी व्यवस्था, आरोग्य व्यवस्था स्थानिकांसाठी विकसित केलेल्या नाहीत. या कंपनीच्यी प्रदूषणामुळे काही लोक मरण पावले आहेत, तर काही कायमचे ग्रस्त झालेले आहेत. | आयोजक यांनी येथे सांगितले की उपस्थित प्रश्न, मुद्दयांची नोंद घेण्यात आलेली आहे. |

## ३) <u>श्री श्रीनिवास घोसकुल्ला, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आज जी जनसुनावणी आयोजित करण्यात आली, ती देखावा आहे की त्याचा काही उपयोग होईल? या प्रकल्पास लागून १०० एकर जमिन आहे. जो शेतकरी शेतात ८-९ क्विंटल पीक घेत होता, तो कसाबसा २-३ क्विंटल येते. शेतकरी सदरहू प्रकल्पामुळे त्रासलेले आहेत. लॉईड कंपनीने त्यांना एक रुपयाचा मोबदला दिलेला नाही. | **प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की** जनसुनवाणी ही समन्वयासाठीची पध्दत आहे. बैठकीत आलेल्या सूचना, आक्षेपांचा विचार करण्यात येतो. त्याची नोंद घेण्यात येऊन त्याप्रमाणेच भारत सरकार पर्यावरण अनुमती प्रदान करते. |
| २) | या विस्तारिकरणामुळे घुग्घुस वासियांना काय लाभ होणार आहे याचे विवरण देण्याची मागणी केली. या प्रकल्पातील खराब पाण्यामुळे स्थानिक शेतक-यांना खूपच त्रास होतो, त्यांची शेती खराब होत आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की विस्तारीकरणामुळे स्थानिकांना रोजगाराची संधि मिळेल. प्रकल्पामुळे शेती खराब होणे व मोबदला याबाबत बाधित शेतक-यांची सूची (लिस्ट) तयार करुन त्यांच्याबरोबर चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| ३) | प्रकल्पाच्या विरुध्द नाहित. कंपनीचे विस्तारिकरण प्रकल्पाअगोदर येथील घुग्घुस स्थानिकांना २०० युनिट वीज ही मोफत देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की कायद्याप्रमाणे वीज फुकट देता येत नाही. प्रकल्पात वीज उत्पादन करण्यात येईल. वीज वितरण कायद्याप्रमाणे करता येत नाही. |
| ४) | स्थानिकांनाच रोजगाराची संधि देण्यात यावी. त्यात ५०% पदे ही स्थानिक महिलांना राखीव असावीत. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात ८०-८५% स्थानिक असून आता दोन महिलांना रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. भविष्यात विशिष्ट संवर्गातील पदे ही महिलांसाठी राखीव ठेवता येतील. |
| ५) | आता आपण चौकातून आलेलो आहोत. तर प्रदूषणामुळे आपण थोडावेळ तरी तेथे उभे राहू शकतो का. | आयोजक यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या प्रश्नांची नोंद घेण्यात आलेली असून त्यास प्रकल्प प्रवर्तक एकत्रित उत्तर देतील. |

४) **<u>श्री सत्यनारायण डकरे, राष्ट्रवादी अल्पसंख्याक सेल अध्यक्ष, ता. जि. चंद्रपूर:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घुस गावाची स्थिती अशी आहे की आभाळ असेल, रात्र असेल तरी घुग्घुस गावात डस्ट उडत असते. येथे घुग्घुस शहरात ४०-५० हजार लोक राहत असून लोकप्रतिनिधींना या शहराविषयी काहीही नाही. या डस्टमुळे खोकल्याचे व इतर आजार असलेले रोग प्रचंड प्रमाणात आहेत. येथील आरोग्य धोक्यात आलेले आहे. त्यासाठी घुग्घुस गावकऱ्यांसाठी एक दवाखाना बांधून द्यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले जेथे कमी पडलो, तेथे मार्ग काढण्यात येईल. प्रकल्प प्रशासनाने विशिष्ट कालावधीत आरोग्यशिबिर आयोजित करण्याबाबत निश्चित केले असून त्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. |
| २) | प्रकल्पाच्या व्यवस्थापनास कितीही निवेदने दिले तर त्याचे उत्तरही देत नाहीत. त्याचप्रमाणे प्रकल्पात महिलांनाही रोजगाराची संधि देण्यात यावी. घुग्घुस येथे ब-याच शिकलेल्या मुली आहेत, त्यांना त्यांच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रोजगाराची संधि देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की प्रकल्पात ८०-८५% स्थानिक असून आता दोन महिलांना रोजगाराची संधि देण्यात आलेली आहे. भविष्यात विशिष्ट संवर्गातील पदे ही महिलांसाठी राखीव ठेवता येतील. |

५) **श्री गणपती पांडुरंग आशीतकर, उसगाव, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मला प्रदूषणाचा त्रास होतो व आमचे जे नुकसान होते त्यासाठी एक वर्षापूर्वी निवेदन दिलेले आहे. त्याचे उत्तर जिल्हाधिकारी कार्यालय, स्थानिक म.प्र.नि. मंडळाच्या कार्यालयाकडून आलेले नाही. त्याची एक प्रत आता बैठकीच्या व्यासपीठावर पाठविलेली आहे. प्रकल्पातील प्रदूषणामुळे होणार खराब पाणी नाल्यातून वाहते, त्यात गंधक मिसळलेले असते. तेच पाणी गुरे पितात. तरी याबाबत पुढील कार्यवाही करुन मला त्याचे उत्तर देण्यात यावे | प्रकल्पामुळे शेती खराब होणे व मोबदला याबाबत बाधित शेतक-यांची सूची (लिस्ट) तयार करुन त्यांच्याबरोबर चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल. नाला सफाईबाबत पुढील कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. |

६) **श्री प्रदीप जोगी, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या कंपनीच्या प्रकल्पामुळे आमच्या शेतीचे, कापसाचे प्रचंड नुकसान होत आहे. कापूस बाजारात नेला तर तो कोणीही विकत घेत नाही, परत घेऊन जा म्हणतात. आमचे आरोग्य धोक्यात आहे. लॉईड मेटल लागून शंभर एकर शेती पडून आहे. शेतक-यांनी शेती करण्याचे सोडून दिले. कारण प्रदूषणामुळे शेतपीकेही खराब होतात. येथील ७०% जनता लॉईड मेटलमुळे विविध आजारांनी त्रस्त आहे. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की सदरहू जनसुनावणी संपल्यानंतर प्रकल्पामुळे शेती खराब होणे व मोबदला याबाबत बाधित शेतक-यांची सूची (लिस्ट) तयार करुन त्यांच्याबरोबर चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल |

७) **श्री गणेश वामनराव शेंडे, शिवसेना उप तालुका प्रमुख, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | चंद्रपूरातील घुग्घुस हे गाव प्रदूषणाबाबत जगातील ४ थ्या क्रमांकावर आहे, अशी नासाने नोंद केलेली आहे. १९९२-९३ साली या प्रकल्पास स्थानिकांनी परवानगी दिली. त्यावेळी आम्हांस असे वाटले नाही की हा कारखाना आम्हांला जीवंत मारणार आहे. कामगारांना काम करताना काही सोयीसुविधा नाही. हा राक्षसरुपी कारखाना कशाला पाहिजे? १९९३ पासून कारखान्याची अवस्था तशीच आहे. कामगारांना मेल्यानंतर ५० लाख देतात, जीवंतपणी १० लाख द्या, आम्ही तुमचे कौतुक करु. दरवर्षी या गावात आजाराने १० हजार माणसे मरत आहेत. नवजात अर्भक हेही जन्मतः आजार घेऊन जन्मत आहे. त्यांनी आक्षेप नोंदविला की मागच्यावेळीही जनसुनावणी घेण्यात आली. त्याने काय फायदा झाला? जर जनतेच्या भावनांची किंमत होत नाही, तर त्या जनसुनावणीला काय अर्थ? | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की २००२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल. |
| २) | आम्ही कारखान्याला आरोग्य शिबिर घ्यायला सांगतो. आज १९९३ नंतर कंपनीला कळते की घुग्घुस गावात पाण्याची समस्या आहे. आज पाण्याचा टँकर गावातून फिरत आहे. | आरोग्य शिबिराबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. कंपनी प्रशासनाने विशिष्ट कालावधीत आरोग्यशिबिर आयोजित करण्याचे योजिले असून त्याबाबत माहिती उपलब्ध करण्यात येईल. |
| ३) | कारखान्याजवळची ३०० एकर जागा यांनी सोडली, विकत घेतली नाही. त्याचे स्पष्टीकरण द्यावे. तेथे शेतकरी पीके घेऊ शकत नाही. त्याला एक पैशाचे उत्पन्न नाही. त्यामुळे शेतकरी हे आत्महत्या करत आहेत | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की विस्तारिकरण प्रकल्पासाठी आम्हांला अतिरिक्त जागेची आवश्यकता नाही. मात्र जागा विकत घेण्याबाबत बैठकीत उपस्थित सूचनांचा विचार करुन त्याबाबत भविष्यात धोरण केले जाईल. |
| ४) | पर्यावरणाविषयी आपण सांगता, तर प्रकल्प प्रवर्तकांनी कुठे झाडे लावली, किती लावली व त्यातील किती जगली आहेत? कुठे आहे तुमचा सीएसआर फंड, किती आरोग्य शिबिरे | |

| | | |
|---|---|---|
| | घेण्यात आली? किती लोकांना सुविधा दिली? जर केले नाही तर विस्तारिकरण कशाला करता असा सवाल त्यांनी विचारला. | |
| ५) | त्यांनी सांगितले की मी व्यक्तीशः मा.मुख्यमंत्री व मा. पर्यावरण मंत्री यांना याबाबत तक्रार केलेली आहे. या घुग्घुस गावातील सर्वांचे आरोग्य चांगले राहिले पाहिजे, त्यांना चांगल्या सोयीसुविधा मिळाल्याच पाहिजे. कारखाना येण्यास आमची काहीही हरकत नाही, पण तो कारखाना राक्षसरुपी नसावा. जर त्यामुळे कामगारबंधुंचे मृत्यु होत असतील, तर असा कारखाना आम्हांला नको | मागील त्रुटी लक्षात घेऊन २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |
| ६) | सादरीकरणात दाखविले की विस्तारिकरण प्रकल्पात ५०० व्यक्तींना रोजगार मिळेल. पण जर ५०,००० लोकांचे आरोग्य धोक्यात येत असेल, तर या प्रकल्पाचा काय फायदा? तरी आपण या गावातून कारखाना काढावा व तो दुसरीकडे न्यावा, तेथे सुरु करावा | |
| ७) | त्याचप्रमाणे असे आढळले की कारखान्यात उत्तरप्रदेश, बिहार, नेपाळमधून कामगार आणतात पण स्थानिकांना रोजगाराची संधि देत नाहीत. जर स्थानिकांना संधि दिली नाही, तर आम्ही त्या गावातही प्रकल्प चालू देणार नाही. | प्रकल्पात ८०-८५% स्थानिक कर्मचारी असून शासनाच्या नियमांप्रमाणे स्थानिकांनाच नोकरीत प्राधान्य देण्यात येईल. |
| ८) | आपण स्वच्छ भारतची घोषणा देतो. येथे काय आहे तर दर महिन्याला प्राथमिक आरोग्य केंद्रात (Primary Health Centre-PHC) जवळजवळ २,००० लोक या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे उपचार घेतात. ज्या शेतक-यांच्या जमिनी घेण्यात आल्या त्यांना मोबदला व रोजगाराची संधि प्रथम देण्यात यावी. | |
| ९) | त्यांनी शासनास मागणी केली की मी कोणाबद्दलही वेडेवाकडे बोलत नाही. प्रथम कार्यरत असलेला कारखाना प्रदूषणमुक्त करण्यात यावा. कारखान्याची दुरुस्ती करण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| १०) | त्यांनी पुढे मागणी केली की या जनसुनावणीचे इतिवृत हे घुग्घुस वासियांना मिळाले पाहिजे. | समन्वयक यांनी सांगितले की बैठकीच्या इतिवृताची प्रत उपलब्ध करुन देण्यात येईल. |

**८) श्री अनंतराव काडे, राहणार-उसगाव, तालुका,जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आमची १५ वर्षे जमिन पडून आहे, त्यात माझी साडे सात एकर जमिन आहे. त्यांनी जमिनीची भरपाई दिलेली नाही. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की विस्तारिकरण प्रकल्पासाठी आम्हांला अतिरिक्त जागेची आवश्यकता नाही. मात्र जागा विकत घेण्याबाबत बैठकीत उपस्थित सूचनांचा विचार करुन त्याबाबत भविष्यात धोरण केले जाईल. |

**९) श्री शामराव रामचंद्र घुगरे, मूळ गाव-घुग्घुस,तालुका.जिल्हा-चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझ्या आज्याच्या आज्याचे गाव घुग्घुस असल्याने वास्तवता काय आहे हे मला माहित आहे. या २७ वर्षात या कंपनीने प्रदूषण नियंत्रणासाठी काहीही केले नाही. प्रदूषणामुळे झालेले आजारी व्यक्तींची श्वसनाचे, त्वचेचे, डोळ्यांचे आजार २०१५ पासून २०२२ पर्यत त्यांनी संख्या वाचून दाखविली व त्यांनी असे प्रतिपादन केले की हा शासकीय अहवाल आहे. त्यांनी सांगितले की या घुग्घुसचा नरक प्रदूषणामुळे करणार आहातका. त्यांनी सांगितले की जनजागृत्ती करुनआम्ही प्रदूषणाविरुध्द लढा चालू ठेवणार आहोत. | मागील त्रुटी लक्षात घेऊन २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |

१०) **श्री रघुनाथ धोंगडे, शिवसेना, माजी शहरप्रमुख, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | ही जनसुनावणी पर्यावरणविषयक आहे. तर या कंपनीमुळे दिवसाचे प्रदूषण तर होतेच, पण रात्री त्याच्या दुप्पट तिप्पट प्रदूषण होते. स्थानिक, ग्रामस्थ प्रदूषणाची तक्रार देण्यास कारखान्यात गेल्यास, प्रकल्पाचे मुख्य अधिकारी हे लपून बसतात व कनिष्ठ अधिका-यास पाठवितात, खासदारांच्या सूचनेनुसार प्रकल्प अधिका-यांनी प्रदूषण न करण्याचे लेखी आश्वासन देऊनही ही कंपनी प्रदूषण करत असते. तर कंपनी व्यवस्थापनाकडून चांगल्याची अपेक्षा काय करायची? | मागील त्रुटी लक्षात घेऊन २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |
| २) | त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की प्रकल्प व्यवस्थापनास शेवटची समज देऊन जर व्यवस्थापन ऐकत नसेल तर विस्तारिकरणास परवानगी देण्यात येऊ नये व यांची परवानगी रद्द करण्यात यावी. | |

११) **श्री बृजभूषण महादेव पाझारे, माजी सभापती, जिल्हा परिषद, चंद्रपूर-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी अध्यक्षांचे स्वागत केले. त्यांनी माहिती सांगितली येथे केमिकल प्रकल्प होता, नंतर एसीसी आणि ड्बल्यु.सी.एल, होते. पण लॉयड्स मेटल्स आल्यानंतर मराठी माणसाच्या हाताला काम मिळू लागले. त्याचबरोबर इतर भाषेतील लोकांनाही काम मिळू लागले. पण आता पाहिले तर वर्धा नदी पूर्णपणे आटलेली आहे. आपण एवढा मोठा | |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प आणता, तर वर्धा नदीवर एक बंधारा बांधला पाहिजे, हे येथे दाखविले नाही | |
| २) | त्याचप्रमाणे असेही सादरीकरणात सांगितले की २०१५-२०२० दर वर्षी तीन हजार झाडे लावली. म्हणजे १८,००० झाडे लावली. पण हे प्रमाण कमी आहे. वर्षाला दहा हजार झाडे लावली पाहिजे. लावलेली झाडे ही जगली पाहिजेत. | |
| ३) | त्याचप्रमाणे प्रकल्प परिसरात शिक्षित, पदवीधर, अभियंता झालेल्या ब-याच मुली आहेत. त्यांनाही प्रकल्पात रोजगार मिळाला पाहिजे. घुग्घुस व परिसरात बरेच दिव्यांग आहेत. त्यांनाही प्रकल्पात रोजगाराची संधि मिळाली पाहिजे. | प्रकल्पात दोन महिला कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले असून भविष्यात काही संवर्गातील पदे ही महिलांसाठी राखाव ठेवता येतील. |
| ४) | घुग्घुसमध्ये अनेक गावे येतात. त्या गावांमध्येही सीएसआर फंडातर्गत विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात आले पाहिजेत. येथे सेंटर्स झाले पाहिजे व त्यातून लोकांना काम मिळाले पाहिजे. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सीएसआर निधीतर्गत सर्व गावांमध्ये सामाजिक योजना राबविण्याचा आमची विचार आहे. |
| ५) | त्यांनी पुढे मागणी केली की मुख्य रस्त्यांवरुन ट्रक्स येतात. तर त्यांच्यासाठी वेगळा बाय-पास हवा. ट्रक्स त्या बाय-पासहूनच आले पाहिजेत. त्यामुळे अपघातांचे प्रमाण कमी होईल. | |
| ६) | प्रकल्पाकडून दरमहा वैद्यकीय शिबिर भरविण्यात यावीत. याचा उल्लेख सादरीकरणात नाही. घुग्घुगसमध्ये प्राथमिक आरोग्य केंद्र आहे. मात्र तेथे औषधांचा तुटवडा असतो. बीपी, डायबेटिसच्या गोळ्या मिळत नाहीत. अनेक वेळा आम्हांला याबाबत निवदेन द्यावे लागते. तर सीएसआर अंतर्गत गोळ्या उपलब्ध वाव्यात. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की कंपनी प्रशासनाने विशिष्ट कालावधीनंतर आरोग्यशिबिर आयोजित करण्याचे नियोजित केलेले आहे. त्याबाबत सर्वांना आगाऊ सूचना देण्यात येईल. |
| ७) | श्री पाझारे यांनी सांगितले की विस्तारिकरणामुळे स्थानिकांचे नुकसान होता कामा नये. स्थानिकांना रोजगार मिळालाच पाहिजे. ग्रामपंचायतीतून स्थानिक | प्रकल्पात ८०-८५% स्थानिक असून शैक्षणिक अहर्ता लक्षात घेऊन त्या व्यक्तीस नियुक्ती देण्यात येते. |

| | | |
|---|---|---|
| | बेरोजगारांची यादी उपलब्ध करण्यात आली पाहिजे. येथे कुठलेही पक्षीय काम नाही. ग्रामसभेत ठराव मंजूर करुन यादी उपलब्ध करण्यात यावी. ग्रामपंचायतीने शिफारस केलेल्या व्यक्तीस रोजगार मिळाला पाहिजे. | |
| ८) | श्री पाझारे यांनी मागणी केली की थंड पाण्याची पाणपोई सुरु करण्यात यावी. येथे काहींनी विरोध केला, त्यांनाही प्रकल्प विस्तारिकरण हवे आहे. त्यांनी प्रदूषणाच्याविरुध्द भूमिका घेतलेली आहे. त्यांचेही हेच म्हणणे आहे की स्थानिकांना रोजगार मिळलाच पाहिजे. | |

१२) **श्री सय्यद अन्वर, घुग्घुस, तालुका, जिल्हा चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी या शहराचा सामान्य नागरिक आहे. आयोजकांनी अगोदरच सूचना केलेली आहे की फक्त पर्यावरणाबाबत बोला. आज आमचे शहर हे प्रदूषणाबाबत पहिल्या क्रमांकावर येत आहे. या शहरात पाण्याची भीषण टंचाई आहे. जर हा प्रकल्प सुरु झाला तर लोकांना प्यायला पाणी मिळेल की नाही अशी भिती आहे. बैठकीत सांगण्यात आले की या प्रकल्पाने एक पाण्याचा टँकर सुरु केला आहे. मी त्याचे समर्थन करतो. मात्र आम्ही आमच्या पक्षातर्फे २-३ टँकरने पाणी पुरवत असतो. तर प्रत्येकाला नळाने पाणी देण्याची योजना प्रकल्पाने हाती घ्यावी. जर प्रकल्प आणत आहात, तर पाण्याची योजनाही तयार करावी | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सीएसआर निधींतर्गत सर्व गावांमध्ये सामाजिक योजना राबविण्याचा आमची विचार आहे. |
| २) | देशात रोजगाराचा गंभीर प्रश्न आहे. त्यासाठी प्रकल्प आवश्यक आहेत. पण ह्या उद्योगांनी लोकांना जगविले पाहिजे. उद्योगाने लोक मारु नयेत. | |

| | | |
|---|---|---|
| ३) | त्यांनी आक्षेप नोंदविला की घुग्घुसमध्ये कोणीही आला तर त्याचे डोळे चुरचुरतात व कपड्यांवर ब-याच प्रमाणात डस्ट पडते. त्यांनी सांगितले की चार महिन्यांपूर्वी आम्ही प्रदूषण व रोजगाराबाबत लॉईड या कंपनीवर मोर्चा आणलेला होता. | |
| ४) | या प्रकल्पात स्थानिकांना डावलून परप्रांतीयांना रोजगार दिल्यास या कंपनीला टाळे लावण्यात येईल. गावातील लोकांना रोजगार, शहरातील लोकांना पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करणे, वार्डातील समस्या यांनी सीएसआर निधीतून सोडवाव्यात. सार्वजनिक शौचालयाची सोय करणे आवश्यक आहे. ती सोय करण्यात यावी. उद्योग हवेत, पण लोकांच्या जीवनाचे रक्षण करुन ते असावेत. | प्रकल्प प्रवर्तकांनी उत्तर दिले की कंपनी प्रशासनाने विशिष्ट कालावधीनंतर आरोग्यशिबिर आयोजित करण्याचे नियोजित केलेले आहे. त्याबाबत सर्वांना आगाऊ सूचना देण्यात येईल. |

**१३) <u>श्री साजन लोणे, माजी ग्रामपंचायत सदस्य, तालुका, जिल्हा-चंद्रपूर:</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी सांगितले की प्रदूषण हा विज्ञानाचा अभिशाप आहे. त्यांनी सांगितले की १९९३ साली या लॉईड्स मेटलला परवानगी दिली. आता जेथे लॉईड्स मेटल्सची कॉलनी आहे, तेथे कारखाना हवा होता व आता जेथे कारखाना आहे, तेथे लॉईड्स मेटल्सची कॉलना हवी होती. स्थानिक ग्रामपंचायतीने फार मोठी चूक केली. | |
| २) | त्यांनी पुढे सांगितले की जोपर्यंत प्रकल्प येत नाही, तोपर्यंत स्थानिकांना रोजगार मिळणार नाही. प्रकल्प परिसरातील कुशल, अकुशल व्यक्तींना रोजगार मिळाला पाहिजे. | |
| ३) | मात्र १९९३ साली जेव्हा हा प्रकल्प आला, त्यावेळी स्थानिकांची जी अपेक्षा होती, ती प्रकल्प प्रवर्तकांनी पुर्ण केलेली नाही. कंपनीला | कंपनीच्या अंतर्गत रस्ते विकास सुरु झालेला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | संरक्षक भिंत नाही. तुमच्या कामगारांना पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही, तुमच्या कामगारांना शौचालयाची व्यवस्था नाही. कंपनीत अपघात झाल्यास वा कर्मचारी व कामगार आजारी पडल्यास त्यांना दवाखान्याची सोय नाही. कंपनीतील रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब आहे. त्यांनी सांगितले की प्रथम कार्यरत प्रकल्पातील अडचणी दूर करण्यात याव्यात. तेथील प्रदूषण कमी करा. | |
| ४) | त्यांनी सूचना केली प्रकल्प हा पर्यावरणपुरक असला पाहिजे. त्यासाठी झाडे लावली पाहिजेत. येथील स्थानिकांना वीज दिली पाहिजे, स्थानिकांना व महिलांना नोकरीची संधी दिली पाहिजे. याबाबत अंमलबजावणी कशी करणार याची माहिती द्यावी. | **प्रकल्पात दोन महिलांची नियुक्ती करण्यात आलेली असून भविष्यात कंपनीतील काही पदे ही महिलांसाठी राखीव ठेवणे शक्य आहे.** |
| ५) | प्रकल्पातील डस्टमुळे परिसरातील शेतक-यांचा कापूस काळा पडतो. त्यामुळे त्यांच्या कापसाला भाव येत नाही. तो फेकून द्यावा लागतो. भाजीपाला काळा होतो, तो टाकून द्यावा लागतो. जर प्रदूषण होत नसेल, तर प्रकल्पास आमची हरकत नाही. तरी प्रथम आपण आपल्या कार्यरत प्रकल्पातील अडचणी, प्रदूषण सोडवून नंतर विस्तारिकरण करावे. आम्ही उद्योगाच्या विरुध्द नाही. | मागील त्रुटी लक्षात घेऊन 2022 मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |
| ६) | त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की तुमच्या प्रकल्पामुळे ज्यांची जमिन गेली, त्यांना उत्पन्नाचे साधन नाही. | जनसुनावणी बैठकीनंतर प्रकल्पग्रस्त शेतक-याची सूची बनविण्यात येऊन चर्चेव्दारे तोडगा काढण्यात येईल. |

**१४) श्री शरद पाईकवारे, घुग्घुस शहर महासचिव, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी सांगितले की सादरीकरणात दर्शविले की विस्तारिकरणामुळे रोजगाराची संधि स्थानिकांना मिळेल. मात्र प्रकल्पात कार्यरत असणा-या कर्मचा-यांना कुठलीही सुविधा | |

| | | |
|---|---|---|
| | उपलब्ध नाही. आरोग्य व सुरक्षितता सुविधा नाही. त्या जुन्या कामगारांनाच आरोग्य व सुरक्षितता सुविधा मिळत नाही, तर नवीन रुजु होणा-या कामगारांना काय मिळणार? तर पूर्वीचे जे कामगार आहेत, त्यांना कायमस्वरुपी करण्यात यावे. कंत्राटी पध्दतीवर जुन्या कामगारांना ठेवण्यात येऊ नये. नंतरच नवीन कामगार कंपनीत घ्यावेत. | |
| २) | त्यांनी बैठकीत विचारले की घुग्घुस कंपनीने स्थानिक लोकांना औषधोपचारासाठी दवाखान्यात किती रुपये खर्च केले? किती आरोग्य शिबिरे राबविलीत? उपस्थितांनी उत्तर दिले की एकही नाही | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आरोग्यशिबिर काही कालावधीनंतर आयोजित करण्याचे कंपनी प्रशासनाने धोरण केले आहे. |
| ३) | श्री शरद पाईकवारे यांनी मागणी केली की – जे जुने कामगार काम करतात, त्यांना प्रकल्पात कायमस्वरुपी करण्यात यावे, | |
| ४) | दर तीन महिन्यांनी घुग्घुसवासियांसाठी आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात यावीत, | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आरोग्यशिबिर काही कालावधीनंतर आयोजित करण्याचे कंपनी प्रशासनाने धोरण केले आहे. |
| ५) | <u>**गणेश गोदारी हा कामगार**</u> काही काम करताना वरून खाली पडला, तो जखमी झालेला आहे. तरी त्यास जसा पगार आहे, तो मिळण्यात यावा व पूर्ण बरा झाल्यानंतर परत कामावर घेण्यात यावे, | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की संबंधित कामगार हा ईएसआय अंतर्गत सभासद आहे. त्यास आजारपणात 90% पगार मिळतो. मात्र याबाबत परत संपूर्ण माहिती घेऊन त्यास न्याय देण्यात येईल. |

**१५)<u>श्री संजय टिपले, सदस्य, नाथाली ग्रामपंचायत आणि सरपंच, उपसरपंच, सदस्य</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आक्षेप नोंदविला की प्रकल्पाची निवासी वसाहत ही नाथाली ग्रामपंचायतीच्या हद्दीत येते. तेथील रस्ता पूर्णपणे खराब झालेला असून कंपनीकडून कधिही रस्त्यावर पाणी मारले जात नाही. तसेच आमच्या गावात वेळोवेळी आरोग्यशिबिर भरविण्यात यावे, गावातील शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यात यावे. | रस्ता जर राज्य सरकारचा मालकीचा असेल, तर प्रकल्प प्रवर्तक त्याबाबत काही करु शकणार नाही. आरोग्यशिबिराबाबत उत्तर देण्यात आलेले आहे. |

१६) **श्री सतिश पुंडे, शिवसेना शहर प्रमुख:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आजपर्यंत जो रोजगार प्रकल्पात दिला, तो किती टक्के देण्यात आला व भविष्यात देण्यात येणारा रोजगार कुठल्या पध्दतीने देण्यात येतील. प्रथम संधि ही घुग्घुसवासियांनाच देण्यात यावी. | प्रकल्पात ८०-८५% व्यक्ती ह्या स्थानिक आहेत. शैक्षणिक अहर्ता विचारात घेऊन रोजगाराती संधि देण्यात येत आहे. |

१७) **श्री काळे, एक स्थानिक शेतकरी:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | माझी जमिन असून ती प्रकल्प प्रवर्तकांना विकत असल्यास त्याला काय किंमत येईल. त्यावेळी **श्री बृजभूषण महादेव पाझारे, माजी सभापती, जिल्हापरिषद, चंद्रपूर** यांनी सांगितले आम्हांला स्थानिक गावातील बरेच शेतकरी हा प्रश्न विचारतात. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी जमीन विकत घ्यावी. तेथे हरित पट्टा विकसित करता येईल. | |

१८) **श्री विनोद जंजाला, अभियंता,**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मी कंपनीत ट्रेनी इंजिनियर आहे. येथे प्रकल्प विस्तारिकरण होत असून ते चांगले आहे. कारण शिक्षित लोकांना रोजगाराची गरज आहे. तरी माझी विनंती आहे की बेरोजगारांना काम मिळण्यासाठी प्रकल्प विस्तारिकरणाची गरज आहे. प्रकल्पात शैक्षणिक अहर्तेनुसार रोजगार देण्यात यावा. | |

१९) **<u>श्री दिनकर काळे, राहणार-उसगांव,तालुका,जिल्हा-चंद्रपूर</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी मागणी केली की त्यांची जमिन प्रकल्पाला लागून असून ती प्रकल्प प्रवर्तकांनी विकत घ्यावी. | प्रकल्प प्रर्वतकांनी सांगितले की विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नाही. मात्र बैठकीत याबाबत करण्यात आलेल्या सूचनांचा निश्चितच विचार करण्यात येईल. |

२०) **<u>श्री मंगेश मारुती, उपसरपंच, उसगांव ग्रामपंचायत, ता. जि. चंद्रपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस प्रश्न विचारला की प्रदूषण होणार नाही असे प्रकल्प अधिकारी म्हणतात, तर आपले मत सांगावे की प्रकल्पामुळे प्रदूषण होणार की होणार नाही. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की प्रकल्पातील उत्पादन प्रक्रियेमुळे प्रदूषण होते, पण ते नियंत्रणात ठेवण्यात येऊ शकते. |
| २) | त्यावेळी उपसरपंच यांनी कंपनीने नुकसान भरपाई किती व कशी देणार याबाबत उत्तर देण्याची मागणी केली. त्यांनी पुढे मागणी केली की कंपनीने सीएसआर अंतर्गत गावात सामाजिक विकास कामे हाती घ्यावीत. | सदस्य यांनी प्रकल्प व्यवस्थापक ती देतील असे सांगितले. |
| ३) | त्यांनी मत मांडले की हवेचे प्रदूषण हे उसगावला होणार, तर रोजगार हा उसगावच्या लोकांना देण्यात यावा. | |

त्यावेळी **<u>श्री गणेश वामनराव शेंडे, घुग्घुस, तालुका जिल्हा चंद्रपूर, शिवसेना उप तालुका प्रमुख</u>** यांनी मागणी केली की स्थानिक शेतक-याला प्रति एकर पंचवीस लाख रुपये मिळाले पाहिजेत.

२१) **श्री राजू रेड्डी, घुग्घुस काँग्रेस शहर अध्यक्ष, ता. जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी मागणी केली की जिल्ह्याचे पालकमंत्री व जिल्ह्याचे एकमेव खासदार यांनी आपणास पाठविलेल्या निवेदनांचा विचार करण्यात यावा. त्यांनी सांगितले की प्रकल्पामुळे रोजगाराची संधि मिळेल. प्रकल्पाला विरोध नाही. मात्र आपल्या घरी ज्या माताभगिनी आहेत, त्यांना प्रदूषणाचा जो त्रास होत आहे, त्याबाबतही विचार करणे आवश्यक आहे. मागच्या जनसुनावणीत या सर्व बाबींवर चर्चा झालेली आहे. त्यांनी सांगितले की उपस्थितांनी ग्रामपंचायतीने शिफारस केलेल्यांना व उमेदवाराच्या पात्रतेनुसार रोजगाराची संधि देण्याची मागणी केलेली आहे. उमेदवारास रोजगार देताना कुठल्याही राजकीय पक्षाच्या विचारसरणीचा विचार न करण्याची मागणी उपस्थितांकडून करण्यात आली, ती रास्त आहे. ज्यांची पात्रता आहे, त्या स्थानिक युवक व युवतींना रोजगार मिळावा. मात्र घुग्घुस प्रदूषणामुळे त्रस्त आहे, तरी त्याबाबत त्वरित उपाय योजना करण्यात याव्यात. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की मागील त्रुटी लक्षात घेऊन २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |

२२) **श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, तेलंगणा:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | पर्यावरण सल्लागार यांनी प्रकल्पाच्या १० कि.मी. परिघातील हवा, पाणी, माती याचे आधारभूत सर्वेक्षण केलेले आहे. तरी १० कि.मी. परिघातील लोकांचे आरोग्यस्थिती, पीकांची स्थिती, भूजल स्थितीचा डेटा गोळा करण्यात यावा. त्याचा उपयोग पर्यावरणीय | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री रेड्डी यांनी लेखी निवेदन देण्याची सूचना केली. त्यांनी प्रकल्पास पाठिंबा देताना स्थानिकांना रोजगार देण्याची सूचना केली. |

| | | |
|---|---|---|
| | समतोल राखण्यासाठी होईल. आपला प्रकल्प २०३ एकरमध्ये आहे. तर पावसाचे पाणी संवर्धन करण्यात यावे. त्याचप्रमाणे भूजलपातळी वाढविण्याचे प्रयत्न करण्यात यावे. | |

**२३) श्री सुरेश मल्हारी पाईकराव, जिल्हा महासचिव, राष्ट्रवादी काँग्रेस, चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | १३/१०/२०२१ रोजीच्या जनसुनावणीमध्ये आम्ही आमची बाजू मांडली आहे. जनसुनावणीत विस्तारिकरणामुळे स्थानिकांना, युवक युवतींना रोजगार मिळेल असे मनोगत ऐकण्यात आले. त्यांनी कंपनीच्या व्यवस्थापनास विचारणा केली की या जनसुनावणीसाठी टाकलेला मंडप कोणी टाकला? गावात मंडप टाकणारे व सोयीसुविधा देणारे असतानाही वणीहून मंडप टाकणा-यास काम दिले, तर कंपनी विस्तारिकरण झाल्यानंतर स्थानिक रोजगाराची संधि कशी देणार? | प्रकल्पात 80-85% व्यक्ती ह्या स्थानिक आहेत. |
| २) | त्यांनी सांगितले की आम्ही प्रकल्पाविरुध्द नाही. आमची भूमिका १३/१०/२०२१ रोजीच मांडली होती. जर येथे प्रकल्प सुरु करायचा आहे तर आम्हांला वीज व पाणी मोफत देण्यात यावे. आता सांगत आहेत टँकरने पाणी देणार. तर स्वतःची टाकी बांधून नळाने पाणी देण्यात यावे. | **वीज वितरण हे कायद्याप्रमाणे करता येत नाही.** |
| ३) | त्यांनी भूमिका मांडली की जे ७५० कामगार विस्तारिकरण प्रकल्पात लागणार आहेत, ते कायमस्वरुपी असले पाहिजेत. प्रकल्पाला तीस वर्षे पुर्ण झाली. पण कामगारांचे तीस रुपयेही वाढले नाहीत. जे गेले ३० वर्षे डस्टमध्ये काम करतात, त्यांना किमान वेतन कायद्याप्रमाणे वेतन मिळते का याचाही विचार | |

| | | |
|---|---|---|
| | व्हायला हवा. त्यांनी परत कायमस्वरुपी कामगार नेमण्याची भूमिका मांडली. | |
| ४) | त्यांनी सांगितले की लोकांना रोजगार मिळणार हे ठीक आहे. पण प्रकल्पाच्या सभोवती जो शेतकरी आहे, त्याच्याबाबत विचार व्हावा. आतापर्यंत शेतजमिनीचा व शेतपीकांचे जे नुकसान झालेले आहे, त्याचा मोबदला कंपनीने किती दिला? जर तसे देणे होत नसेल, तर. शेतक-याने अन्न पिकविले नाही, तर माणसाला खायला मिळणार नाही, म्हणून शेतक-याची काळजी घ्या. परिसरात सर्वेक्षण करुन हेक्टरी किती मोबदला देता येईल याबाबत विचार करण्यात यावा. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की जनसुनावणी संपल्यानंतर लगेचच सभोवतालच्या शेतक-यांची सूची तयार करुन त्यांच्याबरोबर चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल. |
| ५) | आजूबाजूची शेती प्रकल्पाने विकत घ्यावी, जेणेकरुन त्या शेतक-याचा फायदा तरी होईल | बैठकीत देण्यात आलेल्या सूचनांचा येथे निश्चितच विचार करण्यात येईल. मात्र विस्तारिकरणासाठी अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नाही. |

## २४) <u>मिस सना रविंद्र पाटील, म्हातारदेवी ग्रामपंचायत सदस्य, ता. जि.चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रदूषणाबाबतच प्रश्न विचारला. गावाला लागूनच शेती आहे. शेतातील कापूस हा काळा होतो. आमच्या गावात कंपनीची कॉलनी आहे. रस्त्यावर पूर्णपणे डस्ट पडलेली असते. त्यावर एक टँकर पाणी मारण्यात यावे. तसेच आमच्या गावातील युवक युवतींना रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. | रोजगारात स्थानिक लोकांना प्राधान्य देण्यात येते. |

## २५) <u>श्री अमित बोरकर, आम आदमी पार्टी, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर:-</u>

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | आपण प्रदूषणाबाबत बोलण्याची सूचना केली, मात्र या प्रकल्पामुळे स्थानिकांना होणार त्रास व नुकसान याही आपणास ऐकाव्या | |

| | | |
|---|---|---|
| | लागतील. भारताच्या राज्यघटनेनुसार प्रकल्प व्यवस्थापकांना कामगारांना सुरक्षितता व सुविधा या द्याव्यात लागतील. त्यांनी पुढे सांगितले की हे प्रदूषण कोळसा किंवा डस्टचे नाही, तर आयर्न पार्टिकलचे आहे. आयर्न पार्टिकल शरीरात गेल्यावर जीविताला धोका उत्पन्न होतो, ते किडनीत गेले तर किडनी खराब होते, आयर्न पार्टिकल हृदयात गेले तर माणूस हॉर्ट एटॅकने मरतो. या आयर्न पार्टिकल ३० कि.मी. अंतरावर (प्रकल्प स्थानापासून) चंद्रपूरपर्यंत दुष्परिणाम दिसून येतो. तरीही नवीन विस्तारिकरण प्रकल्पास मान्यता कशी देता येते? | |
| २) | तरी प्रदूषण पातळी ७५% कंपनीने कमी केली पाहिजे. प्रकल्पातील कामगारांना भारतीय संविधानाच्या निर्देशांप्रमाणे सुरक्षितता, सुविधा देण्यात याव्यात, परिसरातील शेतक-यांच्या १००% जमिनी खरेदी करण्यात याव्यात. त्यांनी आक्षेप नोंदविला नवजात अर्भक प्रथम आईचे दूध पिण्याअगोदर डस्ट श्वासावाटे खातो. | |
| ३) | त्यांनी पुढे असे सांगितले की प्रकल्प विस्तारिकरणास परवानगी दिली तर अध्यक्ष, आम आदमी पक्ष, घुग्घुस म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या विरुध्द कोर्टात जाणार आहे. त्यासाठी मला उच्च न्यायालय, मुंबई व शेवटी सुप्रीम कोर्टात जावे लागले तरी मी जाणार. तरी मी विस्तारिकरणास परवानगी देऊ नये अशी विनंती करतो. | सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पास आम्ही अनुमती देत नाही वा प्रकल्प उभारणी नाकारत नाही किंवा प्रकल्पाची शिफारसही करत नाही. ही जनसुनावणी ही स्थानिक, प्रकल्पबाधित लोकांचे सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून आपल्या सूचना, विचार, आक्षेप यांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त अध्यक्षांच्या संमतीने मप्रनि मंडळाच्या मुख्यालयातर्फे भारत सरकारच्या पर्यावरण,वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत योग्य तो निर्णय घेते. |

२६)**श्री रोशन परशुराम पचारे, माजी सभापती, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी मत मांडले की जर आम्हांला फक्त पर्यावरणविषयावर बोलण्यास सांगितले असले तरी जेव्हा जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील बैठक म्हणजे सर्व विषय आले. त्यांनी मागणी केली की असा शासनाचा निर्णय आहे का ही जनसुनावणी फक्त पर्यावरणाचा आहे. आयोजक यांनी असा शासन निर्णय असल्याचे सांगितले. | |
| २) | चर्चेत त्यांनी असे सांगितले की प्रकल्प विस्तारिकरणात ७५० व्यक्तींची गरज आहे, तर ५०० लोक घुग्घुसचे व २५० लोक इतर खेड्यातील लागले पाहिजे. तरी माझी विनंती आहे की प्रकल्पात ठेकेदारी पध्दत बंद करुन स्थानिक गरजु लोकांना, नवीन लोकांना संधि देण्यात यावी ही विनंती. | प्रकल्पात शैक्षणिक अहर्ता व कौशल्य पाहूनच स्थानिक व्यक्तींना रोजगारात प्राधान्य देण्यात येते. |

२७) **श्री निळकंठ रामचंद्र नांदे, घुग्घुस, तालुका, जिल्हा-चंद्रपूर:-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी प्रश्न विचारला की २००६-२००७ मध्ये जे कोल वॉशरिजचे युनिट काढले, तर पाण्यावाटे गेलेला डस्ट नाल्यात साचला व नाला आता बुजलेला आहे - गणेश मंदीर ते शेणगाव फाटा — यापर्यंत तो नाला बुजलेला आहे. नाला बुजलेला असल्याने पाणी शेतीत जाते. तरी तो बुजलेला नाला स्वच्छ करुन त्याचे खोलीकरण करण्यात यावे. तसेच बुजलेल्या नाल्यामुळे डस्टचे पाणी हे शेतात जाते. त्यामुळे पिकांचे नुकसान होते. तरी तहसीलदारकडून याचे सर्वेक्षण करण्यात यावे | प्रकल्प प्रवर्तकांनी माहिती दिली की नाला स्वच्छता व खोलीकरण याबाबत प्रकल्प व्यवस्थापनाने अंमलबजावणीचा निर्णय घेतला आहे. |

| | | |
|---|---|---|
| | व शासकीय नियमांनुसार रोजगार देण्यात यावा. | |
| २) | त्यांनी पुढे सांगितले की डस्टमुळे शेतात पीक येत नसल्याने शेतात निलगिरीची झाडे लावली असून त्यांची उंची वाढत नाही. त्यांनी आतापर्यत कंपनीने किती नुकसान भरपाई दिली याचा अहवाल जनतेस द्यावा. तसेच दरवर्षी सर्वेक्षण करुन कष्टक-यांना मोबदला देण्यात यावा. | |

**२८)श्री किरण बांदुरकर, सरपंच, नाकोडा, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | या घुग्घुस परिसरात विस्तारिकरण प्रकल्प येत आहे. त्यात परिसरातील बेरोजगारांना सामावून घ्यावे. शैक्षणिक पात्रतेनुसार काम देण्यात यावे. प्रकल्पास उसगावची शेती गेलेली आहे. तर उसगावला जे काळे पाणी प्रकल्पातील जाते, त्यामुळे शेतीचे नुकसान झालेले आहे. | प्रकल्प विस्तारिकरणात रोजगाराची संधि देताना शैक्षणिक अहर्ता लक्षात घेऊन स्थानिकांना प्राधान्य देण्यात येईल. |
| २) | उसगावातील शेतक-यांनी नुकसानीमुळे शेती सोडून दिलेली आहे. तर त्याचे सर्वेक्षण करुन परत शेती पूर्वीसारखी होणे आवश्यक आहे. त्यानुसार कार्यवाही करावी. | पूर्वी उत्तर दिल्याप्रमाणे जनसुनावणीनंतर स्थानिक नुकसान झालेल्या शेतक-यांची यादी बनविण्यात येऊन प्रथम चर्चा करुनच तोडगा काढण्यात येईल. |
| ३) | जे स्थायी कामगार काम करत आहेत, त्यांना अस्थायी स्वरुपात वर्ग करुन कामात घ्यावे. | |

**२९)श्री मोहन राजुरकर, उसगांव, तालुका, जिल्हा -चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| 1) | माझ्या शेतीचे फार नुकसान होत आहे. या कंपनीला लागून माझी शेती असून माझा स.न. ९५, ६७ आर आहे. या कंपनीने जनसुनावणी प्रथम चंद्रपूरला घेतली होती, त्यात हा विषय | पूर्वी उत्तर दिल्याप्रमाणे जनसुनावणीनंतर स्थानिक नुकसान झालेल्या शेतक-यांची यादी बनविण्यात येऊन प्रथम चर्चा करुनच तोडगा काढण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | ठेवलेला होता. कंपनीने आजपर्यंत दखल घेतलेली नाही व एकरुपायासुध्दा मोबदला मिळाला नाही. कंपनी व्यवस्थापन मला दाद देत नाही. शेतीपीक मी काढू शकत नाही, म्हणून मी कर्जबाजारी झालेलो आहोत. तरी माझी नुकसानभरपाई देण्यात यावी. | |

**३०)<u>सौ. ममता रमेश मोरे, नकोडा ग्रामपंचायत सदस्य, तालुका,जिल्हा-चंद्रपूरः-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | घुग्घुस रहिवाशांना प्रश्न विचारला की कंपनीला २७ वर्षे झाली. तर कितीवेळा घुग्घुसमध्ये आरोग्य शिबिर घेतले. उपस्थितांना एकदाही घेतले नाही असे सांगितले. त्यावेळी सौ. मोरे यांनी उपस्थितांना विचारले की तुम्ही यांच्याकडून विस्तारिकरण झाल्यानंतर शिबिर घेतील अशी का अपेक्षा ठेवतात? कंपनी व्यवस्थापन फक्त आश्वासनच देत आलेले आहेत. | |
| २) | एखाद्या नेत्याने शिफारस केली की त्याच्या माणसास रोजगार देतात. मात्र होतकरु गरीब व्यक्तीने रोजगार मागितल्यास त्याला रोजगार देतात का? | |
| ३) | गावात ब-याच विधवा व होतकरु महिला आहेत. त्यांचा कधी विचार केलेला आहे काय? आजपर्यंत २७ वर्षात किती महिलांनी काम केले? तर आम्ही आपल्यावर विश्वास कसा ठेवायचा? अशा महिला आहेत की त्यांची मुले १-२ वर्षांची असताना त्यांचे पती वारले. त्यांना शेतीचा आधार नाही. | |
| ४) | प्रदूषणाबाबत प्रश्न, आक्षेप नोंदविताना सांगितले दहावेळी फरशी धुतली तरीही पांढरे पाणी कधिच निघत नाही. विस्तारिकरणामुळे वाढणा-या डस्टवर कशा प्रकारे नियंत्रण करण्यात येईल. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सर्व मागील त्रुटी लक्षात घेऊन २०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. प्रकल्प फेब्रुवारी/मार्चला सुरु |

| | | |
|---|---|---|
| | | केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल |
| ५) | सौ.मोरे यांनी घुग्घुस रहिवाशांना प्रश्न विचारला की ८०% स्थानिकांना म्हणजे घुग्घुस रहिवाशांनाच रोजगाराची संधी मिळाली पाहिजे, ती आहे का, उपस्थितांनी नकार दर्शविला. त्यांनी आरोग्याच्या प्रश्नावर आक्षेप घेताना सांगितले की परिसरात त्वचा रोगाचे प्रमाण फारच वाढलेले आहे. त्याचप्रमाणे डोळ्यांचे आजार, दमा, खोकला यांचे प्रमाण लक्षणीय आहे. त्यांनी मासिक आरोग्यशिबिर, तपासण्या घ्या, औषधे उपलब्ध करुन देण्याची मागणी केली. | प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की आरोग्यशिबिर काही कालावधीनंतर आयोजित करण्याचे कंपनी प्रशासनाने धोरण केले आहे. |

**३१) <u>श्री विवेक बबनराव बोडे, भा.ज.प.कार्यकर्ता:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | मागच्या जनसुनावणीच्या वेळी आम्ही आमचे मत मांडले आहे. शेतक-यांच्या समर्थनार्थ व प्रदूषणाच्याविरुध्द भा.ज.प. कार्यकर्ते लढलेले आहेत. जर बेरोजगारांना रोजगार देणारा प्रकल्प असेल तर सदरहू प्रकल्प प्रदूषणविरहित, ग्रीन प्रोजेक्ट व्हावा अशी आमची संकल्पना आहे. रोजगाराची संधि मिळालीच पाहिजे, पण त्याचबरोबर शेतक-यांच्या प्रश्नाकडे पाठ करुन चालणार नाही. शेतक-यांचे प्रश्न सोडविण्यात आलेले पाहिजे. स्थानिक महिलांना प्रशिक्षण केंद्र उभारुन त्यांचे सबलीकरण करणे आवश्यक आहे. | |
| २) | त्यांनी मागणी केली की लॉईड्स प्रकल्पाच्या सीएसआर निधीतून वेळोवेळी आरोग्यशिबिर व लोकोपयोगी उपक्रम हाती घेण्यात आले पाहिजे. त्यांनी पुढे मागणी केली की शैक्षणिक अर्हतेप्रमाणे प्रकल्पात रोजगाराची संधि | **प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सर्व गावामद्ये सीएसआर निधी योग्य प्रकारे खर्च करण्याचे नियोजन करण्याचा मानस आहे.** |

| | | |
|---|---|---|
| | मिळावी. येथे आम्ही कधीही धोरण बदलले नाही. बेरोजगारांना रोजगार लावणारे आम्ही आहोत. | |
| ३) | तरी सदरहू विस्तारिकरण प्रकल्प रोजगार देणार असेल व प्रदूषणविरहित ग्रीन प्रोजेक्ट असेल, बैठकीतील विविध रास्त मागण्या जर प्रकल्प पूर्ण करत असेल, तर आमचा त्यास पाठिंबा व सहकार्य राहिल. पण प्रकल्प जर प्रदूषण उत्पन्न करणारा असेल तर आमचा त्यास विरोध राहिल. | प्रकल्पातील वीजनिर्मिती हा ग्रीन प्रोजेक्ट आहे. प्रकल्प प्रदूषण विरहित करण्यासाठी प्रकल्पात २०१० पासून कोळसा कमी करण्याचा प्रयत्न केला असून स्पॉंज आयर्न प्रकल्पाचा जो वेस्ट आहे, तो पॉवर प्रकल्पाच्या बॉयलरमध्ये वापरतो. प्रकल्पात solid waste power बनविली जाते. त्या २५ मेगावॅट प्रकल्पाचे ८५ मेगावॅटपर्यंत विस्तारिकरण करण्यात येणार आहे. नवीन प्रकल्पासाठी swiss technology वापरणार असून त्यात संपूर्ण वेस्ट हीट वापरली जाणार आहे. एक किलोही वेस्ट वाया जाणार नाही.<br>दुसरा प्रकल्प आहे की आपण जे sponge iron ची डस्ट उडून परिसरात खुपच त्रास होतो. म्हणून आपण स्टीलचे उत्पादन करणार आहोत. त्या स्टीलची आपण बाहेर वाहतुक केली तर प्रदूषण होणार नाही. Sponge iron हा भट्ट्यांमध्येच जाणार आहे. त्यामुळे material handling वाचणार आहे. |

**३२)<u>श्री नागेश मल्हारी पाईकराव, अध्यक्ष, हेल्पींग ऑर्गनायझेन:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी विस्तारिकरणाचा निषेध केला, कारण प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे स्थानिक लोकांना अनेक रोग होत आहेत. दमा, टी.बी., चर्मरोग, असे अनेक रोग आहेत आणि त्यापासून येथील ९ ते १० हजार लोक दरवर्षी ग्रस्त होतात. आम्ही प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून माहिती काढली असता २०१६ ते २०२२ या कालावधीत ४५,००० व्यक्ती प्रदूषणाच्या विविध आजारांनी ग्रस्त आहेत. | |

| | | |
|---|---|---|
| २) | त्यांनी पुढे मागणी केली की सादरीकरणात सांगितले की दरवर्षी तीन हजार वृक्ष लावण्यात येतील, तर ते कागदावर लावू नका तर जमिनीवर लावा. कारण दरवर्षी झाडे लावतात, तर कुठे लावतात व किती जगली हे आम्हाला दिसत नाही. | |
| ३) | तरी विस्तारीकरणाचा आम्ही निषेध करतो. या विस्तारिकरणाचा घुग्घुस व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना काहीही फायदा होणार नाही. ७५० लोकांसाठी ५०-६० हजार लोकांचे आरोग्य धोक्यात घालणे योग्य नाही. त्यांनी सांगितले की आमच्या संस्थेतर्फे या विस्तारिकरणास विरोध आहे. | |

**३३) <u>श्री दीपक खारकर, चंद्रपूर संभाजी ब्रिगेड विधानसभा अध्यक्ष:-</u>**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी सांगितले की या बैठकीत सर्व विषयांची चर्चा झाली. मात्र शेतक-यांबाबत प्रश्न विचारताना शेतकरी हा जगाचा पोशिंदा आहे असे म्हटले ते खरे आहे. तर कंपनीच्या प्रदूषणामुळे होणारे नुकसान हे प्रत्येक शेतक-याचे नुकसान आहे. आज आपला पोशिंदा उपाशी आहे. कारण सरकार भाव देत नाही, निसर्ग झोपू देत नाही आणि प्रदूषित प्रकल्प हे त्यांनी जगू देत नाही. शेवटी हताश होऊन तो आत्महत्या करतो. बैठकीत काही शेतक-यांनी किती मोबदला दिला हे लेखी द्यावे असे म्हटले. | |
| २) | जोपर्यंत प्रकल्पाच्या १५-२० कि.मी. परिघातील सर्व शेतक-यांना कंपनी सरासरी एकरी नुकसान भरपाई रब्बी आणि खरीप पीकांसाठी लेखी स्वरुपात देत नाही व जोपर्यंत तो मोबदला शेतक-याच्या घरापर्यंत पोचत नाही, तोपर्यंत मप्रनि मंडळाने या प्रकल्पास | **याबाबत जनसुनावणी संपल्यावर त्वरित उपस्थित बाधित शेतक-यांची यादी बनवून, चर्चा करुन तोडगा काढण्यात येईल.** |

| | | |
|---|---|---|
| | मान्यता देऊ नये अशी संभाजी ब्रिगेडतर्फे विनंती आहे. | |
| ३) | रोजगार हा सर्वांनाच मिळाला पाहिजे. जो जसा घुग्घुसच्या लोकांना मिळावा, तसाच आजूबाजूच्या खेड्यातील तरुण, तरुणी, बेरोजगार यांना मिळाला पाहिजे. | |
| ४) | ज्या शेतक-याची जमिन अधिग्रहित करण्यात येईल, त्याला मोबदला व नोकरी अशी मागणी करण्यात आली. नोकरीत तुटपुंजा पगार देऊन त्याचे भागणार नाही व ते अन्यायकारक आहे. तरी शेतक-यास मोबदल्याबरोबरच त्या कंपनीचा शेअर देण्यात यावा. | |
| ५) | ग्रामसभेने मंजूर केलेला ठराव जर राष्ट्रपतीसुध्दा रद्द करु शकत नाही, तर ग्रामपंचायतीचे ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक नसणे हे चुकीचे वाटते, | |
| ६) | जर प्रकल्प व्यवस्थापक आपल्या कामगारांना सुविधा देऊ शकत नाही, ते स्थानिक जनतेस काय सुविधा देणार? मासिक वैदकीय शिबिर प्रत्येक गावात आयोजित करण्यात यावे, | |
| ७) | बैठकीत उपस्थित केलेल्या सूचनांप्रमाणे नदीवर बंधारा बांधण्यात यावा, मात्र सर्वात प्रथम सर्वांना पिण्याच्या पाण्याची सुविधा, नंतर शेतीसाठी हाच क्रम ठेवावा, कारण शेतकरी जगला, तरच सर्वांना अन्न मिळेल. | |

**३४) श्री अशोक विश्वनाथ लोळे, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आरोप केला की हा कारखाना प्रदूषण करणारा कारखाना असून प्रकल्प व्यवस्थापन ईएसपी बंद ठेवतात. जेव्हा वातावरण खराब असते, त्यावेळी ईएसपी बंद ठेवतात. संध्याकाळी पूर्णपणे डस्ट सोडतात. आम्ही पत्रकारांना ही गोष्ट सांगितली. पत्रकार | असा कधिही ईएसपी बंद करता येत नाही. ईएसपी बंद केला की ऊर्जा उत्पन्न होत नाही. तांत्रिकदृष्ट्या ईएसपी बंद करत नाहीत. |

| | | |
|---|---|---|
| | काहीही बोलत नाहीत, मग कंपनी पत्रकारांना पैसे देऊन त्याचे तोंड बंद करते. त्यांनी पुढे सांगितले की त्यादिवशी एक पत्रकार आला, माझी सही घेतली, माझा फोटो घेतला, प्रदूषण बंद झालेले नाही. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आले की ते पेपर झाकून नार्मल दाखवितात. | |
| २) | त्यांनी विचारणा केली की ईएसपी का बंद करतात, कारण ईएसपी बंद केले नाही तर प्रदूषण एवढे होणार नाही. तरी ईएसपी सतत चालू ठेवण्यात यावा. त्यांनी पुढे सांगितले की माझे घर प्रकल्पाशेजारी आहे. मी तीनवेळी मंदिरासाठी कंपनीत गेलो होतो. गेटवरुन सुरक्षारक्षकांनी आम्हांला हाकलून दिले. सर्वांचे असे म्हणणे आहे की वीज वाचविण्यासाठी ईएसपी बंद करतात. | |
| ३) | पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीस विनंती केली की आपण सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा कार्यक्षमतेने चालतात का हे पाहूनच त्यांना परवानगी द्या. जर प्रकल्पास तशीच परवानगी दिली, तर आम्ही कंपनीचे गेटच बंद करु. | |
| ४) | स्थानिक पात्रता असलेल्या लोकांना प्रथम रोजगारात प्राधान्य देण्यात यावे. कारखान्याची डस्ट खाणारा जवळच्या माणसास काम न देता, बाहेरच्या माणसाला देतात. त्यांनी पुढे आक्षेप नोंदविला की एखाद्या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याच्या पत्नीस किंवा वारसदारांना रोजगाराची संधि देणे आवश्यक आहे. ती देण्यात यावी. | |

३५) **श्री चेतन बोबडे, अध्यक्ष, युवासेना, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाने सीएसआर निधीतून ५३, ८४, ८५३ रुपये खर्च केले अशी माहिती दिलेली आहे. तर तो कुठे खर्च केला कारण लॉकडाऊन पूर्णपणे होता. त्यांनी पेपरात आलेली बातमी वाचून दाखविली की पाण्याचे बील भरले नाही, म्हणून पाटबंधारे विभागाने कंपनीचा पाणीपुरवठा बंद केलेला आहे. | |
| २) | त्यानी पुढे सांगितले की, तरी प्रदूषण थांबले तरच प्रकल्प विस्तारिकरणास आमचे समर्थन असेल. तसेच रोज पाण्याचे दोन टँकर्सने पाणी शिंपडण्याची मागणी त्यांनी केली. तसेच प्रकल्पात रोजगार देताना ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात यावी. | |

३६) **श्री राजगडकर, उपसरपंच, ग्रामपंचायत नकोडा, ता. जि. चंद्रपूरः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी विस्तारिकरणास समर्थन देताना सदरहू प्रकल्प हा ग्रीन प्रोजेक्ट असावा अशी मागणी केली. फक्त आरोग्यशिबिर आयोजित न घेता अद्ययावत हॉस्पिटल उभारण्याची मागणी केली. कंपनीच्या कामगारांना, घुग्घुस परिसरातील नागरिकांना त्या अद्ययावत हॉस्पिटलचा लाभ झाला पाहिजे. | |

३७) श्री अजय, घुग्घुस शेतकरी, शिवसेना कार्यकर्ता, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूर-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की करोडो रुपयांची चंद्रपूरच्या उजव्या बाजूची शेती या प्रकल्पामुळे मातीमोल झालेली आहे. तीन वर्षे झाली, कापसाचे उत्पन्न नव्हते. त्यांनी सांगितले की मी माझी शेती कंत्राटी पध्दतीने देतो, घुग्घुसमध्ये शेती करुन दाखवावी. घुग्घुस, उसगाव, वडा येथील सर्व शेती प्रदूषणामुळे मातीमोल झालेल्या आहेत. तरी विस्तारिकरण प्रकल्पास शेतक-यांकडून समर्थन नाही | |

३८) श्री निलेश सपाटे, घुग्घुस, ता. जि. चंद्रपूरः-

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|
| १) | त्यांनी सांगितले की माझे घर २०० मीटर अंतरावर आहे. आज कमी प्रदूषणाचा दिवस उजाडला आहे. त्यांनी आरोप केली की कंपनीच्या पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरणात दिलेली माहिती सर्व खोटी आहे. सादरीकरणात दाखविलेली जल, हवा प्रदूषणाची पातळी ही पूर्णपणे खोटी आहे. त्यांनी आक्षेप नोंदविताना सांगितले की कंपनीच्या प्रक्रियेत ध्वनिची पातळी ही अतिउच्च असते की जवळून विमान जाते असा आवाज येतो. | |
| २) | त्यांनी पुढे सांगितले की एकच प्रकल्प असूनही पाणी नसल्याने राजकीय पुढारी टँकर्सने पाणी पुरवतात. तर विस्तारिकरण झाल्यानंतर स्थानिकांना पाणी मिळणारच नाही. स्थानिकांना रोजगार मिळालाच पाहिजे. पण | |

| | | |
|---|---|---|
| | ७०० लोकांसाठी ५०,००० ते ६०,००० लोकांच्या जीवाशी खेळत आहात. | |
| ३) | त्यांनी ग्रामपंचायत कार्यालयाच्या उदासिनतेवर, दंवडी न देण्याबद्दल नाराजी व्यक्त केली. त्यांनी आरोप केली की येथे सामान्य नागरिक कमी असून राजकीय पक्षाशी संलग्न व्यक्तीच भरपूर आहेत. रोजगाराबरोबरच आयुष्यमानही महत्वाचे आहे. या प्रकल्पाच्या प्रदूषणामुळे आम्ही आमचे निवृत्तीचे वयही गाठणार नाही. परिसरातील महिलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. जर कंपनीस कुठलेही निकष पाळणे होत नसेल, तर हा जीवघेणा प्रकल्पच त्वरित बंद करण्यात यावा. विस्तारिकरणाचा प्रश्नच येत नाही. | |

**सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना प्रकल्पाचे कार्यकारी संचालक यांना सर्व प्रश्नांची एकत्रित उत्तर देण्याची सूचना केली.**

**प्रकल्प प्रवर्तक यांनी खालीलप्रमाणे उत्तरे दिली-**

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की सदरहू लॉईड्स मेटल ही कंपनी १९९५ पासून येथे कार्यरत आहे. येथे कंपनीच्या प्रदूषण, रोजगार, सीएसआर निधी, डस्ट इत्यादी बाबत अनेकांनी सूचना, आक्षेप नोंदविले. पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेल्या निर्देशांप्रमाणे उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांना उत्तरे, निराकरण करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे-

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की मागच्या वर्षी जनसुनावणी घेण्यात आलेली होती, व आता आज ही जनसुनावणी घेतली, त्यात प्रदूषण कसे कमी करता येईल, त्यासाठी लागणा-या उपाययोजना, यासाठीच हा प्रकल्प आहे. पर्यावरण आघात मुल्यांकन अहवालात हा Integrated Project असून परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी किती फायदेशीर आहे याबाबत सविस्तर सांगितलेले आहे.

त्यांनी सांगितले की हा Integrated Steel Plant Project आहे. पूर्वी येथे Sponge Iron बनायचे. आता प्रकल्पात Sponge Iron, Steel आणि Power पण बनणार. Sponge Iron मधील वेस्ट हीटमधील Power/ऊर्जा आहे. त्यासाठी आपण वेगळा कोळसा वापरत नाही. प्रकल्पात २०१० पासून कोळसा कमी करण्याचा प्रयत्न केला असून स्पॉंज आयर्न प्रकल्पाचा जो वेस्ट आहे, तो पॉवर प्रकल्पाच्या बॉयलरमध्ये वापरतो व त्यापासून ऊर्जा बनविली जाते. त्या २५ मेगावॅट प्रकल्पाचे ८५

मेगावॅटपर्यंत विस्तारिकरण करण्यात येणार आहे. नवीन प्रकल्पासाठी swiss technology वापरणार असून त्यात संपूर्ण वेस्ट हीट वापरली जाणार आहे. एक किलोही वेस्ट वाया जाणार नाही.

दुसरा प्रकल्प आहे की आपण जे sponge iron ची डस्ट उडून परिसरात खुपच त्रास होतो. म्हणून आपण स्टीलचे उत्पादन करणार आहोत. त्या स्टीलची आपण बाहेर वाहतुक केली तर प्रदूषण होणार नाही. Sponge iron हा भट्ट्यांमध्येच जाणार आहे. त्यामुळे material handling वाचणार आहे.

२०२२ मध्ये तीन महिने पूर्ण प्रकल्प बंद होता. कारण प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा दुरुस्त करायच्या होत्या, त्याचप्रमाणे इतरही प्रणाली दुरुस्त करायच्या होत्या. तो आपण फेब्रुवारी/मार्चला सुरु केला, अजूनही काही प्रणाली सुरु करायच्या आहेत. आता जे आपण पाऊल उचलत आहोत, त्यामुळे या प्रकल्पाची पुर्णपणे दिशाच बदलेल. त्यांनी सांगितले की ही जनसुनावणी संपली की रस्ता करण्यास सुरवात करणार आहे. स्थानिकांनी पूर्वी केलेल्या सूचना, गरज यानुसार प्रकल्पात काम होणार आहे. सहा महिन्यात आपल्या कंपनीचा चेहरामोहरा बदलला जाईल. शासकीय प्रक्रियेनुसार प्रकल्प चालू करण्यास वेळ लागू शकतो (एक दीड वर्षे), मात्र स्थानिकांच्या सांगण्याप्रमाणे बदल झालेले दिसतील. मात्र प्रकल्पात आपल्याला कुठलेही अवैध काम (illegal work) करायचे नाही. कंपनीसाठी, गावासाठी जेवढे चांगले करता येईल, तेवढे मी करणार आहे. रोजगाराबरोबरच माणूसही जगलाच पाहिजे.

१. श्री कृष्णाजी यांनी प्रश्न विचारली की रोजगार कसा मिळेल. तर त्यास उत्तर आहे की शैक्षणिक अहर्तेनुसारच फक्त स्थानिकांनाच रोजगाराची संधि देणार आहोत. कंपनीमध्ये ८०-८५% लोक स्थानिक आहेत. शासकीय निर्देशांनुसार आपण स्थानिक लोकांनाच प्राधान्य देणार आहोत.
२. दुसरा प्रश्न इबादुल सिद्दकी यांचा तर शासकीय नियमांनुसार सर्व करण्यात आलेले आहे.
३. प्रदूषण नियंत्रणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. आम्ही तीन महिने प्रकल्प बंद ठेवला होता. त्यात आपण सर्व प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा बदलून टाकल्या आहेत. वर्षात नवीन प्रकल्प होणार आहे. जुन्या प्रणाली बदलून नवीन प्रणाली आपण कार्यान्वित करत आहोत. त्यामुळे फ्युजिटीव्ह इमिशन्सची बाब ही मोठ्या प्रमाणात कमी होईल.
४. वैदकीय सुविधा पुरविण्यात आम्ही कमी पडलो. त्यावेळी सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सूचना केली की एक अत्यावत दवाखाना बांधणे आवश्यक आहे.
५. कंपनीने वैदकीय उपचारांबाबत धोरण तयार केलेले आहे. त्याचप्रमाणे वैदकीय शिबिराबाबतही नियोजन करण्यात आलेले आहे.
६. त्यावेळी एका उपस्थितांनी २७ वर्षापूर्वीचे कंपनीचे एक पत्र दाखविले की ज्यात लिहिलेले होते की एक सुसज्ज हॉस्पिटल कंपनीच्या आवारात वैदकीय बांधण्यात येईल असे अभिवचन कंपनीने दिलेले होते. त्याचप्रमाणे कंपनीच्या भोवताली व वसाहतीमध्ये हरित पट्टा विकसित करण्यात येईल. २७ वर्षात काहीही झालेले नाही. तर आता किती वर्षांनी होणार. तसेच शैक्षणिक सुविधांबाबत काहीही केलेले नाही.

७. श्रीनिवास बिसकुल्ला –

जनसुनवाणी ही समन्वयासाठीची पध्दत आहे. बैठकीत आलेल्या सूचना, आक्षेपांचा विचार करण्यात येतो. त्याप्रमाणेच भारत सरकार पर्यावरण अनुमती प्रदान करते.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले सर्वांनीच शेतीच्या मोबदल्याविषयी प्रश्न उपस्थित केले. तर संबंधित किसानबंधुंशी चर्चा करुन त्याबाबत निश्चितच पुढील निर्णय घेण्यात येईल. त्यावेळी काही शेतक-यांनी काही मुद्दे उपस्थित केले असता प्रकल्प प्रवर्तकांनी संबंधित शेतक-यांची यादी तयार करण्यास सांगितले. त्यांनी एच.आर.विभागातील अधिका-यास यादी तयार करण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तकांनी सांगितले की ऊर्जा(पॉवर) मोफत देता येणार नाही. पण Pollution Free Power देणार. त्यांनी सांगितले की ते वीज उत्पन्न करणार आहेत, त्यांना वीज वितरण करता येणार नाही.

रत्यावरिल प्रदूषणाबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला. तर समोरित रस्ते हे कॉक्रीटचे करण्यात येणार आहे. राज्य शासनाकडे असलेले रस्ते प्रकल्प प्रवर्तक दुरुस्त करणार नाहित असे त्यांनी सांगितले. त्यांनी सांगितले की प्रकल्पाच्या कार्यक्षेत्रात रस्ते येत नसल्याने ते रोज स्वच्छ करणे शक्य नाही.

त्यावेळी उपस्थित कार्यकर्त्याने सदरहू क्षेत्र हे कुणाच्या अधिपत्याखाली आहे याबाबत विचारणा केली. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी त्यांना निवेदत सादर करण्याची सूचना केली.

त्यावेळी श्री अमित बोरकर, आम आदमी पक्ष, घुग्गुस, ता. जि. चंद्रपूर यांनी गावातील रस्ता कंपनीने वापरू नये अशी सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी चौकशी करुन पुढील कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की आज मे. लॉयड्स मेटल्स एण्ड एनर्जी लिमिटेड, प्लॉट नं.ए-१ आणि ए-२, एमआयडीसी क्षेत्र, घुग्घुस, तालुका व जिल्हा-चंद्रपूर, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित स्पॉन्ज आयर्न प्रकल्पाचे अतिरिक्त २ X५०० टीपीडी किल्नच्या स्थापनेव्दारे ३,२४,००० टन प्रतिवर्ष (४ X १०० टीपीडी व १ X ५०० टीपीडी) ते ६,८४,००० टन प्रतिवर्ष पर्यत व वीज प्रकल्पाचे २५ मेगावॅट ते ८५ मेगावॅट (ड्ब्लुएचआरबी +एएफबीसी) क्षमतेच्या विस्तारिकरण प्रकल्प उभारणीबाबतच्या पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीसाठी एकत्रित जमलो होतो. बैठकीत ब-याच स्थानिकांनी,शेतक-यांनी व प्रकल्पग्रस्तांनी विविध सूचना व आक्षेप उपस्थित केलेले असून त्यांची नोंद घेण्यात आलेली आहे.

अध्यक्ष यांनी सांगितले की सदरहू समिती ही उपस्थितांचे प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेप नोंदविण्यासाठी असून सदरहू समितीस प्रकल्पास मंजूरी देणे, नाकारणे वा शिफारस करण्याचा अधिकार नाही. बैठकीत उपस्थितांनी

प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक शंका, टिकाटिप्पणी, सूचना वा आक्षेपांची नोंद घेण्यात येऊन त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते अंतिम पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना यांच्यासह मुख्यालय, म.प्र.नि.मंडळ ह्याच्या तर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्याप्रमाणे सदरहू अहवाल शासनास सादर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीतील सर्व स्थानिक जनता, प्रकल्पग्रस्त, शासकीय अधिकारी व कर्मचारी, पोलिस यंत्रणा, प्रकल्पाचे सर्व व्यवस्थापन यांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले.

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेले ६७ सूचना,आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(अतुल सातफळे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा उप
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
चंद्रपूर

**(अ. मा. करे)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
चंद्रपूर

**(विशालकुमार मेश्राम)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती तथा
अपर जिल्हादंडाधिकारी,
चंद्रपूर